नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १५२ Issue - 152 | वार सोमवार दि. २० ऑक्टोबर २०२५ Blow- Monday Date 20 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## निवडणूक आयोगाविरोधात १ नोव्हेंबरला सर्वपक्षीय मोर्चा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाविकास आघाडी आणि सहयोगी पक्षांकडून मुंबईत १ नोव्हेंबरला विराट मोर्चा आयोजित करण्यात आलेला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सर्वपक्षीय पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. या सर्वपक्षीय पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील, काँग्रेसचे सचिन सावंत, मनसेचे बाळा नांदगावकर, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते प्रकाश रेड्डी उपस्थित होते.

**संजय राऊतांकडून मोर्चाची घोषणा, सत्तेत असणाऱ्यांनी मोर्चाला यावं, जयंत पाटील यांचं आवाहन**

खासदार संजय राऊत यांनी म्हटलं की शिवसेना भवनच्या पाचव्या मजल्यावर उद्धव ठाकरे पत्रकार परिषद घेतात. मात्र, त्यांच्या ऐवजी आज आपण पत्रकार परिषद घेतोय. महाराष्ट्र निर्माण सेनेचा संपूर्ण कॅबिनेट येथे आले आहे. बाळा नांदगावकर म्हणतात मी २४ वर्षांनी आले पानसे म्हणतात ११ वर्षांनी आलोय. गेल्या काही दिवसांपासून आम्ही निवडणूक आयोगा विरोधात लढाई लढतोय.

यातून काय निष्पन्न होईल माहित नाही. महाराष्ट्राच्या यादीत ९६ लाख मतदार अजूनही आमच्या दृष्टीने घुसखोर आहेत. निवडणूक आयोगाच्या मॅच फिक्सिंग विरोधात हा आमचा लढा आहे.

निवडणूक यादीत घुसलेले १ कोटी मतदार बाहेर काढा असं आवाहन अमित शाह यांना करतो, असं संजय राऊत म्हणाले. ते पुढं म्हणाले की मंदा म्हात्रे, विलास भुमरे यांचा वक्तव्य आम्ही ऐकलं आहे. दुबार आणि बोगस मतदार आहेत हे सत्ताधारी आमदार सांगतात. संजय गायकवाड सुद्धा यावर बोलताय, असं राऊत म्हणाले.

मतदार याद्या पवित्र असायला हव्यात... त्यासाठी सर्व प्रमुख पक्ष लढत आहेत.१ नोव्हेंबर शनिवार निवडणूक आयोगाच्या **(पान ४ वर..)**

## महाराष्ट्राला केंद्राकडून १ हजार ५६६ कोटी रुपये निधी मंजूर

### पूर, भूस्खलन आणि ढगफुटी यांसारख्या आपत्तींमुळे प्रभावित राज्यांना सर्वतोपरी सहाय्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी वित्त वर्ष २०२५-२६ साठी महाराष्ट्र राज्याला राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत केंद्राच्या हिस्स्याच्या दुसऱ्या हप्त्यामध्ये एकूण १,५६६.४० कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. यंदाच्या मान्सून काळात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळं मोठ्या प्रमाणात नागरिक बाधित झाले आहेत. या नागरिकांना तात्काळ मदत आणि पुनर्वसनासाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळं नुकसानग्रस्त नागरिकांना दिलासा मिळणार आहे.





केंद्र सरकार नैसर्गिक आपत्तींच्या काळात राज्य शासनाच्या पाठीशी खंबीरपणे उभा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार नैसर्गिक आपत्तींच्या काळात राज्य शासनाच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. गृह मंत्रालयाच्या शिफारसीनुसार हा निधी मंजूर करण्यात आला आहे. चालू वर्षात केंद्र सरकारने राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत २७ राज्यांना १३,६०३.२० कोटी रुपये आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत १५ राज्यांना २,१८९.२८ कोटी रुपये वितरित केले आहेत. याशिवाय, राज्य आपत्ती न्यूनीकरण निधी मधून २१ राज्यांना ४,५७१.३० कोटी रुपये आणि राष्ट्रीय आपत्ती न्यूनीकरण निधी मधून ९ राज्यांना ३७२.०९ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

पूर, भूस्खलन आणि ढगफुटी यांसारख्या आपत्तींमुळे प्रभावित राज्यांना सर्वतोपरी सहाय्य पुरवण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. या संकटकाळात केंद्राने आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्वंकष उपाययोजना राबवल्या असून, तात्काळ मदत कार्याला गती दिली आहे.यंदाच्या मान्सून काळात, महाराष्ट्रासह देशभरातील ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये बचाव आणि मदत कार्यासाठी एनडीआरएफ च्या विक्रमी १९९ तुकड्या तैनात करण्यात आल्या होत्या. पूर आणि अतिवृष्टीमुळे बाधित क्षेत्रांमध्ये केंद्र सरकारने एनडीआरएफ, सैन्य आणि वायुसेनेच्या तैनातीमार्फत सर्व आवश्यक सहाय्य पुरवले आहे.

## भारताचा वर्ल्ड कपमध्ये सलग तिसरा पराभव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदौर : वर्ल्ड कपमध्ये भारतीय संघावर आता मोठी नामुष्की आली आहे. कारण भारताला वर्ल्ड कपच्या सलग तीन सामन्यांत पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे भारतीय संघाचे वर्ल्ड कपमधील आव्हान संपुष्टात आले आहे की नाही, याची माहिती आता समोर आली आहे.

भारताने वर्ल्ड कपची दिमाखात सुरुवात केली होती. पहिल्याच सामन्यात भारताने श्रीलंकेवर दमदार विजय साकारला होता. त्यानंतर भारताचा सामना पाकिस्तानशी होता. भारताने पाकिस्तानला धुळ चारत दमदार विजय साकारला होता. त्यानंतर भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेशी दोन हात करण्यासाठी मैदानात उतरला होता. भारताला हा सामना जिंकण्याचीही चांगली संधी होती. पण भारत हा सामना जिंकता जिंकता हरली होती. चौथा सामना भारताचा ऑस्ट्रेलियाशी होता. भारताने या सामन्यात ३३० धावांचा डोंगर उभारला होता, पण तरीही भारताला हा सामना जिंकता आला नव्हता. भारत आता पाचवा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला आणि त्यांच्यासमोर इंग्लंडचे आव्हान होते. या सामन्यात भारताला फक्त चार धावांनी पराभव पत्करावा लागला. भारताचा हा सलग तिसरा पराभव ठरला. त्यामुळे भारताचे वर्ल्ड कपमधील आव्हान संपुष्टात आले आहे का, अशी चर्चा सुरु झाली होती. वर्ल्ड कपच्या पॉइंट्स टेबलमध्ये भारतीय संघाचे दोन विजयांसह चार गुण आहेत. भारताचा रन रेट हा ०.५२६ असा आहे. पॉइंट्स टेबलमध्ये न्यूझीलंडचेही चार गुण आहेत, पण त्यांचा रनरेट भारतापेक्षा कमी आहे. त्यामुळे भारताने चौथे स्थान पटकावले आहे, तर न्यूझीलंड पाचव्या स्थानावर आहे. आता भारताच्या दोन मॅचेस शिल्लक आहेत. भारताचा एक सामन न्यूझीलंडशी आणि दुसरा बांगलादेशबरोबर होणार आहे. त्यामुळे या दोन सामन्यांत जर भारताने विजय साकारला तर त्यांना फायनलमध्ये पोहोचता येऊ शकते. भारतासाठी न्यूझीलंडचा सामना सर्वात महत्वाचा असेल. भारतने जर न्यूझीलंडला पराभूत केले तर सेमी फायनलच्या दिशेने मार्गक्रमण करता येईल आणि त्यांना आपले आव्हान टिकवता येईल. भारतासाठी आता दोन्ही सामने महत्वाचे आहेत. या सामन्यांत भारतीय संघ कशी कामगिरी करतो, यावर त्यांचे वर्ल्ड कपमधील भवितव्य अवलंबून असणार आहे.

## राज ठाकरे हे कुशल संघटक, मात्र त्यांच्या भूमिकेत सातत्य नाही, सुधीर मुनगंटीवारांची टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज ठाकरे हे कुशल संघटक आहेत. मात्र, त्यांच्या भूमिकेत सातत्य नाही, कधी ते मोदींची स्तुती करतात तर कधी लाव रे व्हिडिओ म्हणत मोदींवर टीका करतात असे मत भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. त्यांचा राजकीय भरती-ओहोटीचा जो सिद्धांत आहे त्याप्रमाणे ते नवे आरोप करत आहेत. जेव्हा बाळासाहेब ठाकरे यांचा मताधिकार काढण्यात आला, तेव्हा त्यांनी निवडणूक आयोगाला काँग्रेसचा बटीक आहे असं म्हटलं होतं, मतदार यादी हा काही फक्त निवडणूक आयोगाचा अधिकार नाही, तुम्ही देखील ती यादी सदोष आहे निर्दोष आहे हे तपासू शकता असे मुनगंटीवार म्हणाले.

२०१४ मध्ये केंद्रात आणि राज्यात भाजपचं सरकार आलं, तेव्हा तुम्ही असं म्हणता होता की केंद्रात मनमोहन सिंग यांनी आणि राज्यात पृथ्वीराज चव्हाण यांनी बोगस मतदार नोंदणी होऊ दिली. निवडणूक आयोग एकटा मतदार नोंदणी करु शकत नाही, अगदी तलाठ्यापासून ते जिल्हाधिकाऱ्यापर्यंत हजारो लोकं या प्रक्रियेत सामील होतात. त्यामुळं निवडणूक आयोगातील एखाद्या अधिकाऱ्याला वाटलं देखील की आपण कुठल्या विशिष्ट पक्षाला मदत करावी, तर या प्रक्रियेत असलेले हजारो लोकं हा विचार तिथेच ठेचून टाकतील, त्यामुळे हजारो लोकं मिळून हे षडयंत्र करत आहे असं म्हणणं गोबेल्सला देखील शक्य झालं नसतं असे मुनगंटीवार म्हणाले. जर तुमच्याकडे पुरावे असतील तर ते कोर्टात सादर करा असे मुनगंटीवार म्हणाले. पत्रकार परिषद घेऊन त्याने



फक्त खमंग बातम्या होतील दुसरं काही होणार नाही असाटोला मुनगंटीवार यांनी राज ठाकरे यांना लगावला. तुमच्याकडे जर योग्य पुरावे असतील तर सुप्रीम कोर्ट योग्य ते निर्देश देईल पण सगळी यंत्रणाच भ्रष्ट आहे असं म्हणणं काही योग्य नाही. आंदोलन करणं प्रत्येक पक्षाचा अधिकार आहे. पण निवडणूकच होऊ देणार नाही असं म्हणणं म्हणजे काय? असा सवाल मुनगंटीवार यांनी केला. सुप्रीम कोर्टाने ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळं निवडणूक आयोग देखील यामध्ये काही करु शकत नाही, तुमच्याकडे जर ठोस पुरावे असतील तर कोर्टात जा आणि ३१ जानेवारी पर्यंत निवडणूक पूर्ण करण्याचे जे आदेश आहे ते रद्द करा, सरकार काही सुप्रीम कोर्टाच्या आदेशाबाहेर जाऊ शकत नाही.

**'महाज्योती'च्या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

## 'महाज्योती'च्या माध्यमातून होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार करू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीचे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न आज आकारास आले आहे. येत्या काळात ही प्रशासकीय इमारत आधुनिक आणि विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त ठरणार आहे. आपण इतर मागासवर्ग विभागाची स्थापना केल्यामुळे गती मिळाली. या विभागाच्या माध्यमातून होतकरू नवीन पिढी आकारास येईल तसेच त्यांच्या स्वप्नांना बळ मिळून गगनभरारी घेता येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

सदर येथील जिल्हा नियोजन भवन आवारात महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त व नियोजन राज्य मंत्री ड. आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार सर्वश्री प्रवीण दटके, परिणय फुके, कृष्णा खोपडे, विकास ठाकरे, चरणसिंग ठाकूर, आशिष देशमुख, संजय मेश्राम, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, ओबीसी समाजाला पुढे नेण्यासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. यात प्रशिक्षण, स्वयंरोजगार यांचा समावेश आहे. ओबीसी समाजातील मुलांच्या उज्वल भविष्यासाठी महाज्योतीची निर्मिती केली असून याला पुरेसा निधी उपलब्ध केला आहे. आज ओबीसी मुलासाठी ६० पेक्षा जास्त वसतिगृह सुरू करण्यात आली आहेत. महाज्योतीतून प्रशिक्षण घेऊन मुले विविध स्पर्धा परिक्षेत यश संपादन करीत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ओबीसी समाजाची नॉन क्रिमिलिअर मर्यादा आपण आठ लाखांपर्यंत नेली आहे. ओबीसी समाजाच्या कल्याणसाठी शासन तत्पर असल्याचे ते म्हणाले.

**शैक्षणिक प्रगतीचा पाया घालणारा क्षण - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाज्योती संस्थेच्या स्वतंत्र इमारतीची पायाभरणी आज झाली आहे. हा ऐतिहासिक क्षण आहे. नागपूरच्या भूमीवर आता 'महाज्योती'ची भव्य ७ मजली प्रशासकीय इमारत तयार होणार आहे. हा केवळ वास्तूचा नव्हे तर शैक्षणिक प्रगतीचा पाया घालणारा क्षण असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

**ही प्रशासकीय इमारत शिक्षणासह संस्कार आणि संशोधनासाठी आदर्श मापदंड ठरेल - मंत्री अतुल सावे**

नागपूर येथील महाज्योतीच्या प्रशासकीय इमारतीत वाचनालय, समुपदेशन कक्ष, प्रशिक्षण कक्ष, भोजन कक्ष आणि २४८ विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय अशा सर्व सुविधांचा समावेश असणार आहे. ही वास्तू म्हणजे शिक्षण, संस्कार आणि संशोधनाचा पवित्र संगम राहणार आहे. नाशिक येथे देखील महाज्योती संस्थेचे प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी






१७४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे मंत्री श्री. सावे यावेळी म्हणाले.

महाज्योती संस्थेतून प्रशिक्षण घेऊन यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक सत्कार व महाज्योतीच्या यशोगाथा पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आला. तसेच सात मजली प्रशासकीय इमारत बांधकामाची चित्रफीत दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी केले. आभार मुख्य लेखा अधिकारी प्रशांत वावगे यांनी मानले. तर सूत्रसंचालन दिनेश मासोडकर यांनी केले.

**अशी असेल सात मजली प्रशासकीय इमारत**

राज्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रशिक्षण आणि संशोधनासाठी उभारली जाणाऱ्या भव्य ७ माळ्याची प्रशासकीय इमारतीचे बांधकाम नागपूर सुधार प्रन्यास (एनआयटी) मार्फत होत आहे. महाज्योतीच्या कार्यक्षमतेत आणि सेवाक्षमतेत अभूतपूर्व वाढ घडवणारा हा पायाभूत उपक्रम ठरणार आहे. या प्रशासकीय इमारतीत तळघर क्रमांक १ व २ मध्ये मुबलक वाहनतळाची व्यवस्था करण्यात येणार आहे. तळमजल्यावर ५०० लोकांच्या क्षमतेचे ऑडिटोरियम, अभ्यास कक्ष, नियंत्रण कक्ष आणि उपहारगृह असणार आहे. पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यांवर अधिकारी व कर्मचारी यांची बैठक व्यवस्था तसेच प्रशासकीय सभागृह असतील. तिसऱ्या मजल्यावर अभिलेख कक्ष व उपहारगृह, तर ४, ५, ६ आणि ७ व्या मजल्यांवर प्रशिक्षण कक्ष आणि बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. ही इमारत आधुनिक तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक बांधणी आणि कार्यक्षम जागा नियोजनाचा सुंदर संगम ठरणार आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज




## संपादकीय....

### केंद्राची मदत

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी वित्त वर्ष २०२५-२६ साठी महाराष्ट्र राज्याला राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत केंद्राच्या हिस्स्याच्या दुसऱ्या हप्त्यामध्ये एकूण १,५६६.४० कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. यंदाच्या मान्सून काळात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळं मोठ्या प्रमाणात नागरिक बाधित झाले आहेत. या नागरिकांना तात्काळ मदत आणि पुनर्वसनासाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळं नुकसानग्रस्त नागरिकांना दिलासा मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार नैसर्गिक आपत्तींच्या काळात राज्य शासनाच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. गृह मंत्रालयाच्या शिफारसीनुसार हा निधी मंजूर करण्यात आला आहे. चालू वर्षात केंद्र सरकारने राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत २७ राज्यांना १३,६०३.२० कोटी रुपये आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत १५ राज्यांना २,१८९.२८ कोटी रुपये वितरित केले आहेत. याशिवाय, राज्य आपत्ती न्यूनीकरण निधी मधून २१ राज्यांना ४,५७१.३० कोटी रुपये आणि राष्ट्रीय आपत्ती न्यूनीकरण निधी मधून ९ राज्यांना ३७२.०९ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पूर, भूस्खलन आणि ढगफुटी यांसारख्या आपत्तींमुळे प्रभावित राज्यांना सर्वतोपरी सहाय्य पुरवण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. या संकटकाळात केंद्राने आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्वंकष उपाययोजना राबवल्या असून, तात्काळ मदत कार्याला गती दिली आहे. पूर आणि अतिवृष्टीमुळे बाधित क्षेत्रांमध्ये केंद्र सरकारने एनडीआरएफ, सैन्य आणि वायुसेनेच्या तैनातीमार्फत सर्व आवश्यक सहाय्य पुरवले आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्ता : वरदान की शाप?






– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आजचा काळ माहिती आणि तंत्रज्ञानाचा आहे आणि आजचे जग हे तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणारे जग आहे. संगणक, इंटरनेट, मोबाईल यानंतर मानवजातीसमोर उभे राहिलेले सर्वात मोठे आव्हान व संधी म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता विज्ञानाने इतकी झेप घेतली आहे की, मानवी मेंदूची कार्यपद्धतीच यंत्रांमध्ये उतरवली गेली. या शोधाला आपण कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशिअल इंटेलिजेंस (AI) असे म्हणतो. हे तंत्रज्ञान म्हणजे मानवी मेंदूचे यंत्ररूप. माणसासारखे विचार करणे, शिकणे आणि निर्णय घेणे ही क्षमता याच्याकडे आहे. सुरुवातीला केवळ स्वप्न वाटणारे हे तंत्रज्ञान आज आपल्या घराघरात, खिशातल्या मोबाईलपासून ते जगाच्या अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे केवळ सोयी नाहीत, तर नवी शक्यता आहेत पण सोबतच धोक्यांची सावलीही आहे. हाच तर आधुनिक युगाचा मोठा प्रश्न आहे. त्यामुळेच त्याच्या शक्यतांबरोबर भीतीही वाढत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे जीवनात वेग आला, अचूकता आली आणि मानवी क्षमतेचा विस्तार झाला. जसे, एखादा आजार ओळखणे, शस्त्रक्रिया करणे किंवा नवे औषध शोधणे या सगळ्या गोष्टींमध्ये AI डॉक्टरांचा विश्वासू सहकारी बनला आहे. आज हजारो जीव वाचत आ-हेत ते या तंत्रज्ञानामुळेच. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षमतेनुसार मार्गदर्शन करते. एका गावात बसलेल्या मुलालाही जागतिक दर्जाचे ज्ञान मिळू शकते, हा याचाच चमत्कार. उत्पादन कमी वेळेत, कमी खर्चात आणि अधिक गुणवत्तेसह होत आहे. ग्राहकांशी बोलणारे चॅटबॉट्स हे तर आता दैनंदिन आयुष्याचा भाग झाले आहेत. अवकाश, समुद्राचा तळ, अणुभट्ट्या किंवा आपत्तीग्रस्त भाग जिथे माणसाचे पाऊल टाकणेही धोक्याचे, तिथे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित यंत्रे मानवाचे प्राण वाचवत आहेत.

पण प्रत्येक प्रकाशासोबत सावलीही असते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या झपाट्याने वाढणाऱ्या प्रभावामुळे मानवी जगत काही गंभीर प्रश्नांना सामोरे जात आहे. कारखाने, बँका, दवाखाने सर्वत्र मानवी श्रमाऐवजी यंत्रांचा वापर वाढत आहे. लाखो हातांना काम मिळणार नाही, ही भीती खरी आहे. सोपे उत्तर शोधणारा विद्यार्थी किंवा पटकन निर्णय घेणारा अधिकारी सगळेच यावर अवलंबून होत चालले आहेत. विचार करणे, समस्यांना स्वतः भिडणे ही क्षमता कमी होत आहे. आपले फोटो, आवाज, माहिती कुठे साठवली जाते, कोण वापरतो याची आपल्याला जाणीव नसते. चुकीच्या हा-तात गेल्यास हेच तंत्रज्ञान धोकादायक शस्त्र ठरू शकते. युद्धासाठी वापरले जाणारे AI रोबोट्स एखाद्या क्षणात हजारो जीव घेऊ शकतात. पण त्यांना माणसाच्या वेदना जाणवत नाहीत. मग अशा निर्णयांची जबाबदारी कोणाची? श्रीमंत देश आणि मोठ्या कंपन्या याचा सर्वाधिक फायदा घेत आहेत. पण गरीब समाज मागे पडत आहे. तंत्रज्ञानाची ही दरी उद्या सामाजिक संघर्षाला कारणीभूत होऊ शकते.

२१ व्या शतकात तंत्रज्ञानाची प्रगती म्हणजे मानवी आयुष्याचा नवा अध्याय आहे. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता हा सर्वात महत्त्वाचा शोध मानला जा-तो. मशीन लर्निंग, रोबोटिक्स, ऑटोमेशन, डेटा ॲनालिसिस, चॅटबॉट्स या सर्व संकल्पना कृत्रिम बुद्धिमत्तेच्याच छत्राखाली येतात. हे तंत्रज्ञान मानवाच्या मेंदूच्या विचारक्षमतेची नक्कल करून काम करते आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढवते. मात्र, प्रत्येक तंत्रज्ञानाप्रमाणेच यालाही फायदे आणि दुष्परिणाम आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे फक्त संगणक प्रोग्रॅम नाही, तर मानवी संस्कृतीचा आरसा आहे. जसे आपण त्याचा वापर करू, तसे परिणाम दिसतील. अविचाराने वापर केला तर ते विनाशकारी ठरेल, पण सजगतेने वापर केला तर ते मानवजातीच्या विकासाचे शिखर ठरू शकेल. म्हणूनच, सरकारने कडक कायदे करणे, शैक्षणिक संस्थांनी नैतिकतेचे धडे देणे, उद्योगांनी सामाजिक जबाबदारी स्वीकारणे आणि नागरिकांनी सजग राहणे या सर्वांची गरज आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तामुळे भविष्यात माणूस अधिक शक्तिशाली होईल की यंत्राचा गुलाम बनेल? हा प्रश्न उभा राहतो. काळजीपूर्वक, जबाबदारीने आणि मानवी संवेदनांची जाण ठेवून जर आपण AI चा वापर केला, तर ते खऱ्या अर्थाने मानवजातीसाठी वरदान ठरेल. अन्यथा, त्याच AI मुळे आपले अस्तित्व धोक्यात येऊ शकते. त्यामुळे हा न फक्त तंत्रज्ञानाचा विषय आहे, न फक्त अर्थकारणाचा. तो म्हणजे मानवाच्या भविष्याचा आरसा आहे.

# नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित तेवीस जिल्ह्यातील ३३ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना ३ हजार २५८ कोटीची मदत वितरणास मान्यता



## यंदाच्या खरीप हंगामातील नुकसानीपोटी आतापर्यंत सात हजार ५०० कोटीची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्यास शासन संवेदनशीलपणे काम करत आहे. बाधित शेतकऱ्यांना तत्काळ मदत व्हावी म्हणून २३ जिल्ह्यातील ३३ लाख ६५ हजार ५४४ शेतकऱ्यांच्या २७ लाख ५९ हजार ७५४.७७ हेक्टर क्षेत्रावरील बाधित पिकांच्या मदतीसाठी तीन हजार २५८ कोटी ५६ लाख ४७ हजार इतका निधी वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुखमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मदत व पुनर्वसन विभागामार्फत नैसर्गिक आपत्तीत बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम केले जात आहे. मागील सात दिवसात सुमारे पाच हजार कोटीवर निधी वितरित करण्याचे आदेश निर्गमित केले असून यंदाच्या खरीप हंगामातील नुकसानीपोटी आतापर्यंत सुमारे सात हजार ५०० कोटीची मदत वितरणास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे आपदग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळून त्यांचे जीवन अधिक सुकर होईल, असा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री श्री.जाधव पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील; मागील सात दिवसात सुमारे पाच हजार कोटींवर मदत

नागपूर विभागातील तीन लाख ७६ हजार ९६८ शेतकऱ्यांच्या तीन लाख ४४ हजार ६२९.३४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३४० कोटी ९० लाख ८ हजार निधीचा समावेश आहे. नागपूर - एक लाख २ हजार ८५० शेतकऱ्यांच्या ८५ हजार ६४१.८८ हेक्टर क्षेत्रासाठी ११२ कोटी ३७ लाख रुपये. चंद्रपूर- ९३ हजार ८९५ शेतकऱ्यांच्या ८१ हजार ७२६.८० हेक्टर क्षेत्रासाठी ६९ कोटी ४६ लाख ८६ हजार रुपये. वर्धा- एक लाख ४९ हजार ५४६ शेतकऱ्यांच्या एक लाख ६७ हजार ४७६.९६ हेक्टर क्षेत्रासाठी १४२ कोटी ४० लाख ११ हजार रुपये. भंडारा- १८ हजार ९५३ शेतकऱ्यांच्या ६ हजार ४२५.४१ हेक्टर क्षेत्रासाठी १० कोटी ४८ लाख ३६ हजार रुपये. गोंदिया- सहा हजार ३९८ शेतकऱ्यांच्या दोन हजार ३०९.४६ हेक्टर क्षेत्रासाठी तीन कोटी ५० लाख २१ हजार रुपये. गडचिरोली- पाच हजार ३२६ शेतकऱ्यांच्या एक हजार ४८.८३ हेक्टर क्षेत्रासाठी दोन कोटी ६७ लाख ५४ हजार रुपये.

अमरावती विभागातील चार लाख ७८ हजार ९०९ शेतकऱ्यांच्या पाच लाख २६ हजार ३८१.३६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४६३ कोटी ८ लाख ३० हजार निधीचा समावेश आहे. अकोला- दोन लाख ९ हजार ४५४ शेतकऱ्यांच्या एक लाख ७२ हजार ८७५.१९ हेक्टर क्षेत्रासाठी १६२ कोटी ९५ लाख ३४ हजार रुपये.

अमरावती- ४८ हजार ७१ शेतकऱ्यांच्या ४५ हजार ८८२.७४ हेक्टर क्षेत्रासाठी ३८ कोटी ४ लाख ५१ हजार रुपये. यवतमाळ- दोन लाख २१ हजार ३८४ शेतकऱ्यांच्या तीन लाख ७ हजार ६२३.४३ हेक्टर क्षेत्रासाठी २६२ कोटी ८ लाख ४५ हजार रुपये.

पुणे विभागातील आठ लाख २५ हजार १८९ शेतकऱ्यांच्या सात लाख नऊ हजार २०९.१५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ९५१ कोटी ६३ लाख ३७ हजार निधीचा समावेश आहे. सातारा- तीन हजार ३८८ शेतकऱ्यांच्या एक हजार ५६२.६७ हेक्टर क्षेत्रासाठी दोन कोटी ४९ लाख ५ हजार रुपये. सोलापूर- सहा लाख ७८ हजार ५९२ शेतकऱ्यांच्या पाच लाख ३८ हजार ८८९.५४ हेक्टर क्षेत्रासाठी ७७२ कोटी ३६ लाख ४५ हजार रुपये. पुणे- ५२ हजार ७८९ शेतकऱ्यांच्या २१ हजार ९५१.९४ हेक्टर क्षेत्रासाठी ३४ कोटी ४२ लाख ८७ हजार रुपये. सांगली - ९० हजार ४२० शेतकऱ्यांच्या एक लाख ४६ हजार ८०५ हेक्टर क्षेत्रासाठी १४२ कोटी ३५ लाख रुपये.

नाशिक विभागातील १५ लाख ७९ हजार २३९ शेतकऱ्यांच्या ११ लाख ५० हजार ३०१.७६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १४७४ कोटी ८४ लाख ९ हजार निधीचा समावेश आहे. नाशिक - चार लाख नऊ हजार ४७४ शेतकऱ्यांच्या दोन लाख ८८ हजार ८०६ हेक्टर क्षेत्रासाठी ३१७ कोटी १५ लाख ७७ हजार रुपये. धुळे - १६ हजार ३५७ शेतकऱ्यांच्या ११ हजार ५९४.१९ हेक्टर क्षेत्रासाठी १० कोटी २२ लाख ९७ हजार रुपये.

नंदुरबार- ९३१ शेतकऱ्यांच्या ४४५.०६ हेक्टर क्षेत्रासाठी ५३ लाख ९९ हजार रुपये. जळगाव - तीन लाख २५ हजार ३५९ शेतकऱ्यांच्या दोन लाख ४७ हजार २६२.०१ हेक्टर क्षेत्रासाठी २९९ कोटी ९४ लाख ४७ हजार रुपये. अहिल्यानगर - आठ लाख २७ हजार ११८ शेतकऱ्यांच्या सहा लाख दोन हजार १९४.५० हेक्टर क्षेत्रासाठी ८४६ कोटी ९६ लाख ८९ हजार रुपये.

कोकण विभागातील एक लाख पाच हजार २३९ शेतकऱ्यांच्या २९ हजार २३३.१६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २८ कोटी १० लाख ६३ हजार निधीचा समावेश आहे. ठाणे- ३५ हजार ६७६ शेतकऱ्यांच्या नऊ हजार ४८०.११ हेक्टर क्षेत्रासाठी आठ कोटी ३७ लाख ६५ हजार रुपये. पालघर- ४९ हजार ५१७ शेतकऱ्यांच्या १३ हजार ७४४.२३ हेक्टर क्षेत्रासाठी १४ कोटी ४२ लाख ७ हजार रुपये. रायगड- १८ हजार ५७८ शेतकऱ्यांच्या पाच हजार ८२९.४६ हेक्टर क्षेत्रासाठी पाच कोटी नऊ लाख ९ हजार रुपये. रत्नागिरी- एक हजार १५३ शेतकऱ्यांच्या १०३.८८ हेक्टर क्षेत्रासाठी १३ लाख ५३ हजार रुपये. सिंधुदुर्ग- ३१५ शेतकऱ्यांच्या ७५.४८ हेक्टर क्षेत्रासाठी आठ लाख २९ हजार रुपये.

# आत्मनिर्भर आणि बलशाली भारतासाठी हिंदुस्थान एरॉनॉटिक्सची भूमिका महत्त्वाची : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक/जिमाका : नाशिकची भूमी अध्यात्मिकतेबरोबरच आत्मनिर्भरतेचे प्रतिक असून देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत आत्मनिर्भर होऊन बलशाली होण्यासाठी या भूमीतील हिंदुस्थान एरॉनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) या प्रकल्पाची महत्त्वाची भूमिका आहे, असे प्रतिपादन देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले.

हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या ओझर (नाशिक) येथील प्रकल्पात एलसीए एमके १एची (तेजस) तिसरी उत्पादन साखळी आणि एचटीटी ४० या प्रशिक्षणार्थी विमानाच्या दुसऱ्या उत्पादन साखळीचा शुभारंभ आज सकाळी संरक्षण मंत्री श्री. सिंह यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, एचएएलचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. डी. के. सुनील, संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव संजीवकुमार आदी उपस्थित होते.

संरक्षण मंत्री श्री. सिंह म्हणाले की, एचएएलच्या ओझर प्रकल्पात मिग, सुखोई ३०, तेजस आणि प्रशिक्षणार्थी विमानांची निर्मिती होऊन त्यांनी अवकाशात घेतलेले उड्डाण हे देश आणि संरक्षण विभागासाठी अभिमानाची बाब आहे. हे केवळ गौरवाचे उड्डाण नसून आत्मनिर्भर भारताचे उड्डाण आहे. गेल्या सहा दशकांपासून कार्यान्वित एचएएल संरक्षण उत्पादनांसाठी महत्वाचे आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत देशाला संरक्षण उत्पादनांबाबत परकीय देशांवर अवलंबून राहावे लागत असे. ६५ ते ७० टक्के साहित्य आयात केले जात असे. आता या परिस्थितीत बदल होत आहे. आता ६५ टक्के साहित्य देशातच तयार होत आहे. लवकरच सर्व साहित्य देशांतर्गत तयार करण्यात येईल. एचएएलने विविध संस्थांच्या सहकार्याने उत्पादित केलेले लढाऊ विमाने ही देशासाठी गौरवाची बाब आहे. देशाचे हवाई दल नवीन तंत्रज्ञानाच्या विमानांमुळे अधिक मजबूत होईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश संरक्षण साहित्य उत्पादनात स्वयंपूर्ण आणि सक्षम होत आहे. त्यामुळे आयातीवरील अवलंबित्व कमी झाले. देशांतर्गत संरक्षण उत्पादनांचे मूल्य २०२९ पर्यंत तीन लाख कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे देशाचे आयातीवरील अवलंबित्व कमी होईल. तसेच संरक्षण उत्पादनांचे निर्यात मूल्य सन २०२९ पर्यंत दुप्पट म्हणजे ५० हजार कोटी रुपयांपर्यंत करण्याचे ध्येय आहे. ते निश्चितपणे साध्य केले जाईल. गेल्या १० वर्षांत भारताने गतीने संरक्षण उत्पादन क्षेत्रात प्रगती केली आहे. त्यामुळे लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे, यंत्र, लढण्यासाठी आवश्यक इलेक्ट्रॉनिक साधनांची निर्मिती भारतातच होत आहे. मेक इन इंडियांतर्गत स्थानिक उत्पादकांना प्रेरणा देण्याचे काम सुरू आहे. त्याचाही लाभ होत आहे. यामुळे स्थानिक उद्योजकांनाही पाठबळ मिळत आहे.

### ओझर येथील कार्यक्रमात तेजससह शिक्षणार्थी विमान राष्ट्राला समर्पित

सध्या युद्धनीतीत बदल होत आहेत. वेगवेगळ्या पातळ्यांवर लढाया लढल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर, ड्रोन सिस्टिम आणि नेक्स्ट जनरेशनमधील विमाने भविष्यातील लढायांची दिशा निश्चित करतील. एचएएलमध्ये निर्मित मिग २१ विमानांची देशांच्या सीमांचे संरक्षण केले. त्यात एचएएलचे योगदान उल्लेखनीय आहे, असे सांगत त्यांनी अलिकडेच राबविण्यात आलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या वेळेस एचएएलने पूर्ण क्षमतेने काम केले. या काळात त्यांनी २४ तास सेवा बजावली, असे सांगत एचएएलच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मंत्री श्री. सिंह यांनी कौतुक केले. तसेच एचएएलने खासगी क्षेत्राच्या सहकार्याने जागतिक पातळीवर दर्जेदार उत्पादनांची निर्मिती करीत आहे. हा परिसर डिजिटल आणि पेपरलेस आणि परिपूर्ण शाश्वत झाला आहे, असा मला विश्वास आहे, असे सांगत त्यांनी एचएएलने स्वीकारलेल्या नवतंत्रज्ञान व गुणवत्तेचे कौतुक केले. तेजस आणि प्रशिक्षणार्थी विमानाच्या निर्मितीमुळे परिसरातील अनेकांना रोजगाराची उपलब्धता झाली आहे. तसेच आगामी काळात नागरी आणि सैन्य दलाच्या विमानांची दुरुस्ती, व्यवस्थापन आणि ओव्हरऑलची सुविधा यामुळे या दोन्ही क्षेत्रात भारताची विकासाकडे वाटचाल सुरू झाली आहे, असेही त्यांनी सांगितले.

संरक्षण सचिव संजीवकुमार, एचएएलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुनील यांनी मनोगत व्यक्त करताना एचएएलच्या माध्यमातून देशसेवेत बजावण्यात येणाऱ्या कामगिरीची माहिती देत आगामी काळात ही सेवा अखंडपणे सुरूच राहील, अशी ग्वाही दिली. यावेळी वैमानिक के. के. वेणूगोपाल, प्रत्युष अवस्थी यांनी तेजस आणि एचटीटी ४० या विमानांच्या थरारक कसरती सादर करीत संरक्षण मंत्री श्री. सिंग यांना सलामी दिली. हिंदुस्थान एरॉनॉटिकल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी साकेत चतुर्वेदी यांनी आभार मानले.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह सैन्य दल, वायू दलातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासन व एचएएलचे वरीष्ठ अधिकारी व कर्मचारी, विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' विशेष तपासणी अभियानांतर्गत

# राज्यात ३ हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत राज्यात 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत राज्यात ३ हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये दूध, खवा/मावा, खाद्यतेल, तूप, मिठाई, ड्रायफ्रूट्स, चॉकलेट्स, भगर व अन्य अन्नपदार्थांचे एकूण ४ हजार ६७६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. या तपासणीत अनियमितता आढळलेल्या एक हजार ४३१ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली असून ४८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले तर एका आस्थापनेचा परवाना रद्द करण्यात आला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाने दिली आहे.

### अन्न व औषध प्रशासन विभागाची माहिती

जनतेस सुरक्षित, दर्जेदार अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, सचिव धीरज कुमार व आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासना विभागांमार्फत राज्यात सणासुदीच्या कालावधीत अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान दिनांक ११ ऑगस्ट २०२५ ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. नागरिकांनीही सणासुदीच्या काळात अन्नपदार्थ खरेदी करताना गुणवत्ता, पॅकिंगवरील माहिती आणि परवाना क्रमांक यांची खात्री करूनच खरेदी करावी. भेसळीबाबत संशय आल्यास जवळच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाने केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शेतकऱ्यांच्या लढ्याला यश; बारा तासांच्या जलसमाधी आंदोलनानंतर अखेर प्रशासन झुकलं!

## शेतकऱ्यांच्या ठाम भूमिकेमुळे आणि गावकऱ्यांच्या ऐक्यामुळे अखेर यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील पळसखेड चक्का येथे शेतकरी योद्धा कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष बालाजी सोसे यांनी मागील बारा तासांपासून ४५ फूट उंच पाण्याच्या टाकीवर बसून सुरू केलेल्या जलसमाधी आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे.

शेतकऱ्यांच्या ठाम भूमिकेमुळे आणि गावकऱ्यांच्या ऐक्यामुळे अखेर प्रशासनाला चर्चेच्या टेबलावर यावं लागलं.

या आंदोलनाच्या ठिकाणी तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार वराडे साहेब, सिंदखेडराजा मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, विनोदजी वाघ, प्रवीणजी गीते, दिलीप भाऊ चौधरी, गजानन भाऊ जायभाये, तसेच पळसखेड चक्का येथील अनेक शेतकरी उपस्थित होते. सर्वांच्या समक्ष झालेल्या चर्चेतून शेवटी मार्ग निघाला.

तहसीलदार साहेबांनी स्वतः बालाजी सोसे यांच्याशी फोनवर संपर्क साधून लेखी आश्वासन दिले की –

येणाऱ्या दिवाळीनंतर आठ दिवसांच्या आत पळसखेड चक्का येथील सर्व शेतकऱ्यांना २०२५ चा हंगामी बागायती मोबदला आणि २०२४ च्या खरीप हंगामातील अतिवृष्टीची मदत दिली जाईल.

बातमी प्रसिद्ध होताच क्षणी प्रशासन खडबडून जागा झाली आणि अखेर चर्चेतून मार्ग निघाला एक पाऊल प्रशासन मागे या स्पष्ट आश्वासनानंतर बालाजी सोसे यांनी आंदोलनाला तात्पुरती स्थगिती जाहीर केली असून, शासनाने दिलेलं हे आश्वासन प्रत्यक्षात उतरलं नाही तर





पुन्हा याहून मोठं आंदोलन उभं केलं जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या ठिकाणी गावातील महिला मंडळ, युवक मंडळ, पुरुष मंडळ आणि सर्व नागरिकांनी ठामपणे पाठिंबा देत उपस्थिती लावली, त्यामुळे संपूर्ण गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

# दीपावली २०२५: श्री विठ्ठलास व रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वसुबारस पासून दीपावली महोत्सवास सुरवात झाली आहे. पोशाखावेळी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले असल्याचे माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, मोत्याचा तुरा, दंड पेट्या जोड मोठा, हिऱ्याचा कंगण जोड, मोत्याची कंठी १ पदरी, मारवाडी पेट्याचा मोत्याचा हार, बाजीराव कंठी, मस्त्य जोड, तुळशीची माळ १ पदरी, शिरपेच लहान, मोर मंडोळी इत्यादि अलंकार परिधान करणत्यात आलेले





आहेत.

तसेच रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, म्होरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा, इत्यादि पारंपारिक अलंकार परिधान करणत्यात आलेले आहेत.

तसेच दिपावलीत वसुबारस, धनत्रयोदशी दिवाळी पाडवा, नरकचतुर्दशी आणि लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर, तुकाराम भवन, श्री.ज्ञानेश्वर दर्शन मंडप व भक्त निवास इत्यादि ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे.

प्रतिवर्षी प्रमाणे श्री. विठ्ठल व रुक्मिणी मातेस पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. सदरचे अलंकार पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# कोंढवा पोलीस ठाण्याचे नुतन पोलीस वरिष्ठ निरीक्षक कुमार घाडगे यांचे सरपंच वनिता सुरवसे यांनी केले स्वागत व अभिनंदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट प्रतिनिधी : पुणे येथे कोंढवा स्थानिक पोलिस ठाण्यात नुकतेच नवीन पोलीस वरिष्ठ निरीक्षक म्हणून अक्कलकोट तालुक्यातील सांगवी गावचे श्री.कुमार गुलाबराव घाडगे यांनी पदभार स्वीकारला. या निमित्ताने गोगावंच्या सरपंच, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्ह्याच्या समन्वयक सौ वनिता मधुकर सुरवसे व मित्रपरिवार यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



. अगोदर पुणे येथे बिबवेवाडी पोलीस स्टेशन ला सुद्धा दमदार कामगिरी केलीच होती, आता त्याहून चांगली संधी आपणास मिळालेली आहे या संधीचं नक्की सोनं करताल यात काहीच शंका नाही. कोंढवा परिसरास एक सिंघम अधिकारी भेटलेला असुन आपली कामगिरी दमदार दिसेल अशी आशा सरपंच वनिता सुरवसे यांनी व्यक्त करून त्यांच्या पुढील भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास कोंढवा गावातील प्रसिद्ध उद्योगपती समाधान दांडेकर, मधुकर सुरवसे, सुधीर गायकवाड, सुनील जगताप, आकाश सुरवसे, रोहित जगताप, धनंजय सुरवसे सर्व पोलीस अधिकारी उपस्थित होते. सत्कार समारंभात श्री. कुमार घाडगे यांना पुष्पगुच्छ व शाल श्रीफळ व श्री स्वामी समर्थ यांचा फोटो देऊन सन्मान व स्वागत करण्यात आले.

आपल्या मनोगतात वरिष्ठ निरीक्षक श्री. कुमार घाडगे यांनी नागरिकांच्या सहकार्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यावर भर देत, गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचे आश्वासन दिले. तसेच पोलिस व नागरिक यांच्यातील समन्वय वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

# समाजोद्धारासाठी विकी बाबा चौधरी चोविस तास अलर्ट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :

विकीबाबा चौधरी हे सातत्याने समाजाच्या उद्धारासाठी झटणारा एक सक्षम असं सामाजिक कार्यकर्ता आहे. सातत्याने समाजाच्या उत्थानासाठी काम करणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची अक्कलकोट तालुक्यामध्ये ओळख.जात, धर्म, प्रांत, भाषा असा कोणताही भेदभाव न करता सर्वसमावेशक भूमिका कायमस्वरूपी घेतले आहेत.समाजाच्या उद्धारासाठी विकी बाबा चौधरी चोविस तास अलर्ट असतां ७ महाराष्ट्रातील विशेष करून अक्कलकोट तालुक्यातील गोरगरीब जनतेसाठी हॉस्पिटलची कोणतीही समस्या निर्माण झाली तर ते सातत्याने सोडवत असतात. हॉस्पिटलच्या संदर्भाने रात्री बे रात्री रुग्णासाठी स्वतःच्या पैशातून पुणे मुंबई या ठिकाणी घेऊन जाऊन अक्कलकोट तालुक्यातील अनेक जनतेचे विनामूल्य ऑपरेशन करून दिलेले आहेत. अक्कलकोट तालुक्यातील गोरगरीब जनतेचे आरोग्य सुधारले पाहिजे यासाठी सातत्याने गोरगरिबांच्या हॉस्पिटलच्या प्रश्नासंदर्भात काम केलेले आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी शासन दरबारी प्रश्न मांडलेले आहेत. अक्कलकोट तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेट देऊन त्यांना मदतीचा हात त्यांनी दिलेले आहेत. शेतकऱ्याच्या न्यायहक्कासाठी कायमस्वरूपी ते लढा देत आलेले आहेत. शिव, फुले शाहू आंबेडकर, महात्मा बसवेश्वर, अहिल्याबाई होळकर, संत सेवालाल महाराज, या महापुरुषांना अभिप्रेत असलेला समाज निर्माण झाला पाहिजे यासाठी चळवळीच्या माध्यमातून सक्रियपणे काम केलेले आहेत.

'विकी बाबा चौधरी है सामान्य घरातून आलेला एक सामाजिक कार्यकर्ता आहे. अनेक संकटाचा सामना करून गावांमध्ये परिवर्तन झालं पाहिजे गावातील सर्व समाजाला सोबत घेऊन गावाने त्यांना उपसरपंच पदावरती निवड केल्यानंतर त्यांनी आपल्या गावचा विश्वास सार्थ करून दाखवलेला आहे. गाव ज्या ज्या वेळेस संकटात असेल त्यावेळेस गावाला त्यांच्या परीने काय देता येईल ते सातत्याने देण्याचा प्रयत्न ते केलेले आहेत. विकी बाबा चौधरी हे एक संवेदनशील व्यक्तिमत्व आहे. एक पारदर्शक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे, चारित्र्यवान व्यक्तिमत्व अशी त्यांची समाजामध्ये ओळख आहे. मुळात विकी बाबा चौधरी हे विद्यार्थी दशे पासून चळवळीमध्ये सक्रिय सहभाग आहेत. गेल्या पंचवीस वर्षापासून चळवळीमध्ये सक्रियपणे सहभाग घेऊन आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, संविधान अशा शाश्वत कामासाठी त्याने समाजाच्या उद्धारासाठी पूर्ण वेळ सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम केलेले आहेत. असा कार्यकर्ता राजकारणामध्ये आला पाहिजे ही लोकांची प्रखर इच्छा आहे. विकी बाबा चौधरी हे सातत्याने ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण करत आलेले आहेत. त्यामुळे सर्वांच्या सुखदुःखामध्ये जातीच्या धर्माच्या चौकटीच्या बाहेर सर्व माणसे समान आहेत अशी भावना त्यांची सातत्याने राहिलेली आहे. कोणत्याही प्रश्नासाठी त्यांनी सर्व समूहाला घेऊन सर्वसमावेशक विकासाची गंगा वाहिली पाहिजे यासाठी ते काम करत आलेले आहेत. अशा कार्यकर्त्याला दहिटणे पंचायत समिती वरती पाठवण्याची संधी आलेली आहे. ही संधी म्हणजे गरिबांचा आवाज सामान्यांचा आवाज इथल्या शेतकऱ्यांचा आवाज इथल्या हॉस्पिटल मधल्या पेशंटचा आवाज पंचायत समितीमध्ये घुमला पाहिजे यासाठी विकी बाबा चौधरी यांना पंचायत समिती मध्ये सर्व लोकांची सेवा करण्यासाठी संधी मिळावी. अशी आमची सर्व रिपब्लिकन पार्टी ऑफ इडीया एकतावादी च्या वतीने मागणी आहे.

# अकोल्याचा 'कलासक्त योद्धा' वैभव सांगळे यांची चित्रकला; जनपथ प्रदर्शनात ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू

नवी दिल्ली : जन्मजात कर्णबधिरतेवर दुर्दम्य इच्छाशक्तीने मात करत, चित्रकलेच्या बळावर आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करणारे अकोल्याचे सुपुत्र, चित्रकार वैभव तानाजी सांगळे हे सध्या नवी दिल्लीतील जनपथ, हँडलूम हाट येथे आयोजित 'स्पेशल एक्सपो: सूत्रांचा प्रवास' (द जर्नी ऑफ थ्रेड्स )मध्ये सहभागी झाले आहेत. वस्त्र मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित या सात दिवसीय प्रदर्शनात वैभव सांगळे यांच्या चित्रांतून साकारलेल्या 'भावस्पर्शी कलाविष्काराने' अनेक कला रसिकांचे लक्ष वेधले आहे.

भारतीय पारंपरिक हातमाग आणि हस्तशिल्प कलेला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित या विशेष प्रदर्शनात देशभरातील ७५ विणकर, स्वयं सहायता गट (डक्क्ऱ) आणि सहकारी संस्था भाग घेत आहेत. १६ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात विविध राज्यांचे कलाकार आपापल्या क्षेत्रातील पारंपरिक वस्त्र आणि शिल्पकला प्रदर्शित करत आहेत.

या प्रदर्शनात वैभव तानाजी सांगळे यांच्या स्टॉलला उत्तम प्रतिसाद मिळत असून, त्यांच्या पोट्रेट्स, निसर्ग चित्र, ग्रामीण जीवन आणि वारली पेंटिंग्जमध्ये आढळणारी 'प्रवाही आणि भावनिक अभिव्यक्ती' ही कलाकृतींची प्रमुख वैशिष्ट्ये ठरत आहेत.

**'कलासक्त योद्धा' वैभव सांगळे: प्रेरणादायी प्रवास आणि सर्वोच्च सन्मान**

वैभव सांगळे यांना त्यांच्या अदम्य जिद्द आणि कलेच्या सामर्थ्यावर कर्णबधिरतेवर मात करून केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी सन २०२३ चा 'राष्ट्रीय सर्वश्रेष्ठ (पान ४ वर..)

**खा. सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन दिल्या दिवाळीच्या शुभेच्छा**

# खासदार सुनेत्रा वहिनी पवार यांना दीर्घायुष्य लाभो... श्री तुळजाभवानी माते चरणी अभिषेक करून किसन जाधव यांनी घातले साकडे





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राष्ट्रवादी काँग्रेसच्या राज्यसभा खासदार सुनेत्रा वहिनी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी ईच्छा भगवंताची परिवारातर्फे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या तुळजापूर येथील मंदिरात देवीस अभिषेक व धार्मिक विधिवत पूजन करून खासदार सुनेत्रा वहिनी पवार यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पवार कुटुंबीयांच्या वतीनं महाराष्ट्राच्या विकासात्मक सेवा त्यांच्या हातून घडो असे साकडं यावेळी घालण्यात आलं. तसेच यावेळी सुनेत्रा वहिनी पवार यांना व्हिडिओ कॉल द्वारे तुळजाभवानी मातेचे थेट दर्शन घडवण्यात आले. १८ ऑक्टोंबर रोजी सुनेत्रा वहिनी पवार यांचा वाढदिवस असतो.

यावेळी राष्ट्रवादी प्रदेशचे नेते प्रमोद दादा हिंदुराव,प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, निलेश कांबळे, सचिन गुत्तेदार, उमेश जाधव, माणिक कांबळे, महादेव राठोड, आनंद गाडेकर आदींची उपस्थिती होती. खासदार सुनेत्रा वहिनी पवार या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आज आपण महाराष्ट्राचे कुलस्वामिनी श्रीक्षेत्र तुळजापूर येथील मंदिरात श्री तुळजाभवानी माते चरणी नतमस्तक होऊन अभिषेक करून खासदार सुनेत्रा वहिनी पवार यांच्या दीर्घायुष्यासाठी साकडं घातलं असल्याचे यावेळी किसन जाधव म्हणाले. किसन जाधव यांनी सुनेत्रा वहिनी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त केलेल्या या कार्याची प्रशंसा केली जात आहे. यावेळी किसन जाधव यांनी तुळजापूर येथून बारामती येथील सहयोग बंगला या निवासस्थानी जाऊन सुनेत्रा वहिनी पवार यांना श्री तुळजाभवानी मातेचे अभिषेक आणि महाप्रसाद सुपूर्द करून आणि खास दिवाळीच्या निमित्ताने बैलगाडीचे प्रतीक असणारे ड्रायफ्रूट्स भेट देऊन त्यांना वाढदिवसाच्या आणि दीपावली निमित्त शुभेच्छा दिल्या. राज्यामध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. तसेच पवार कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींचे निधन झाल्यामुळे खासदार सुनेत्रा वहिनी पवार यांनी आपला वाढदिवस न साजरा करण्याचा निर्णय घेतला होता परंतु किसन जाधव यांच्या प्रेमापोठी त्यांनी श्री तुळजाभवानी मातेचे प्रसाद आणि अभिषेक स्वीकारले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते पार्थ दादा पवार यांचा देखील किसन जाधव यांनी भेट घेऊन दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

# पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सरकार कटिबद्ध

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांची दिवाळी कीट व भाऊबीज भेट वाटप कार्यक्रमात ग्वाही







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : माढा तालुक्यातील केवड, उंदरगाव, वाकाव या पूरग्रस्त भागातील ग्रामस्थ व शेतकऱ्यांना दिवाळी कीट व भाऊबीज भेट वाटप करताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले की, सरकार पूरग्रस्तांचे संसार पुन्हा उभे करण्यासाठी कटिबद्ध असून, नियमांच्या चौकटीत अडकून न राहता मदत पोहोचवली जाईल.

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दिवाळी कीट वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले, स्वतःचा जीव धोक्यात घालून स्वयंसेवक, ग्रामस्थ व प्रशासनाने धैर्याने काम केले. आम्ही फुंकर मारण्याचा प्रयत्न केला असून मुख्यमंत्र्यांनी नियमांच्या पुढे जाऊन मदत जाहीर केली आहे. पंचनामे झालेल्या शेतकऱ्यांना दोन दिवसांत मदत मिळेल.

दिवाळीसाठी परिपूर्ण कीट तयार करण्यात आले असून, यात आवश्यक वस्तूंचा समावेश आहे. यामध्ये साडी, पँट, शर्ट व कीटचेही वाटप करण्यात आले. घरकुलासाठी जागा व वाळू उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असून, द्राक्षबागांचे पंचनामेही करण्यात येणार आहेत. राज्य शासनाकडून घरांसाठी ₹१.२० लाख तर प्रधानमंत्री घरकुल योजनेतून ₹२.५० लाख देण्याचा प्रयत्न आहे.

रस्ते, पूल दुरुस्ती, विद्युत पंपांचे पुनर्बांधणी, वीजबिल असणाऱ्या शेतकऱ्यांना मदत, तसेच जमीन वाहून गेलेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करण्यासाठीही मुख्यमंत्र्यांशी चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार अभिजीत पाटील यांनी प्राथमिक मदत दिल्याचे सांगत, जमीन गमावलेल्या शेतकऱ्यांना नवीन जमीन देण्याची गरज व्यक्त केली. प्रा. शिवाजीराव सावंत (राजवी ॲग्रो) यांनी शासनाने दिलेल्या प्राथमिक मदतीबाबत समाधान व्यक्त करत अधिक मदतीची अपेक्षा व्यक्त केली. रणजितसिंह शिंदे (जिल्हा दूध संघ) यांनी पुरतला ऊस सरसकट तोडण्याची ग्वाही दिली व विद्युत मोटारीसाठी नुकसानभरपाईची मागणी केली.

कार्यक्रमास पालकमंत्री गोरे, आमदार पाटील, प्रा. सावंत, अध्यक्ष शिंदे, दादासाहेब साठे, नगराध्यक्षा मीनल साठे, पृथ्वीराज सावंत, सरपंच ऋतुराज सावंत, सरपंच कुसुम पाटील, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, तहसिलदार संजय भोसले, गटविकास अधिकारी महेश सुळे, चेतनसिंग केदार, मुन्ना साठे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सचिन बेंडभर यांचा शिक्षक संजीवनी मासिकाकडून विशेष सन्मान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : शिक्षक संजीवनी सन्मान सो-हळा नुकताच पुण्यात पार पडला. यात महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर यांचा सन्मान ज्येष्ठ साहित्यिक व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जयवंत अवघडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी उपसंचालक मकरंद गोंधळी, ज्येष्ठ साहित्यिक बाळकृष्ण बाचल, चेअरमन अविनाश सकुंडे, झुंज दिवाळी अंकाचे संपादक अनिल वडघुले, डायरेक्टर महेश थोरवे, अपेक्षा दिवाळी अंकाची संपादक दत्तात्रय उभे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

सचिन बेंडभर यांचे दरवर्षी जवळजवळ ५० पेक्षा जास्त दिवाळी अंकात कथा, कविता, लेख आणि कादंबरी अशा स्वरूपात लेखन असते. त्यांच्या या कार्याची दखल घेत आमच्या मासिकाने यावर्षी त्यांचा विशेष सन्मान केला, असे मत मासिकाचे संपादक देविदास लिमजे व कार्यकारी संपादक डॉ. संजय जगताप यांनी व्यक्त केले.

> **शिक्षक संजीवनी या मासिकाने अल्पावधीतच शिक्षण आणि साहित्य क्षेत्रात क्रांती केली आहे. शिक्षकांना एक हक्काचे व्यासपीठ निर्माण करून देण्याची काम या मासिकाने केली आहे. यातून अनेक लिहीत्या हातांना बळ देण्याचे कार्य हे मासिक करत आहे. या मासिकाने माझा सन्मान केल्याबद्दल मी मासिकाचे संपादक व त्यांच्या टीमचे मनःपूर्वक आभार मानतो.**
>
> **– सचिन बेंडभर**
> **राज्य पुरस्कार विजेते साहित्यिक शिक्षक**

शिक्षक संजीवनी मासिका तर्फे दिवाळी अंकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी साहित्यिक सचिन बेंडभर यांचा सन्मान कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जयवंत अवघडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिक्षक संजीवनी दिवाळी अंकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर झालेल्या निमंत्रित कवी संमेलनात महाराष्ट्रातील दहा कवींनी सहभाग घेतला. आसू आणि हसू यांचा मेळ घालत कवींनी भरदार कविता सादर केल्या. त्याला उपस्थित श्रोत्यांनी टाळ्या आणि हश्यांची दाद दिली.

नागनाथ घाटुळे, योगिता कोठेकर, शुभांगी भोसले, कल्पना गवारी, रवींद्र सोनवणे, संजय अडसुळे, शुभांगी शिंदे, माधुरी इंगळे, दिपाली वाघमारे, प्रतिमा काळे, देवेंद्र गावंडे, राघवेंद्र गणेशपुरे, विनोद अस्तुल, शरदचंद्र काकडे, राहुल भोसले, विलास बाबर आदी साहित्यिक यावेळी उपस्थित होते.

# बोपगांव येथे भारत फोर्ज लि. पुणे,यांजकडून शेतकऱ्यांना आंबा व नारळ झाडांचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड :

मौजे बोपगांव ता. पुरंदर जि. पुणे येथे ग्राम विकास योजनेअंतर्गत भारत फोर्ज लिमिटेड कंपनी पुणे यांच्या अर्थ व तंत्र साह्याने मौजे बोपगांव येथील शेतकऱ्यांना आंबा व नारळ झाडांचे डॉ. सौ लिना देशपांडे (सी. एस. आर. विभाग प्रमुख -भारत फोर्ज लि. पुणे )यांच्या शुभ हस्ते व श्री जयदीप लाड (समन्व्यक उडठ भारत फोर्ज लि.)तसेच बोपगांव गावासाठी नेहमीच मोलाचे सहकार्य असणारे श्री सागर तात्या काळे (जलदूत पुरंदर) यांच्या प्रमुख उपस्थितीत आंबा व नारळ झाडांचे वाटप करण्यात आले.




या कार्यक्रमासाठी बोपगावच्या विद्यमान सरपंच सौ सारिका गुरव, साहेबराव फडतरे, कुंडलिक फडतरे, मयूर दयानंद फडतरे (भाजप युवा पुणे जिल्हा उपाध्यक्ष ), राहुल काका फडतरे, कानिफनाथ फडतरे (माजी सरपंच ), मारुती बापू फडतरे, मसकू आप्पा फडतरे, दयानंद निवृत्ती फडतरे, बापू अनंता फडतरे, नितिन फडतरे यांच्या सह अनेक शेतकरी बंधू तसेच शाळेतील विद्यार्थी उपस्थितहोते. झाडे मिळवण्यासाठी सामाजिक कार्यकरते नंदू भाऊ फडतरे यांनी पाठपुरावा केला होता.

# ग्रामीण भूमिहीन लाभार्थ्यांना प्राधान्याने घरकुलाचा लाभ द्यावा : ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.**

मुंबई : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनेतंर्गत घरकुलाचे काम व्यापक प्रमाणात सुरु असून त्याअंतर्गत ७२ हजार ९७ घरकुल पूर्ण झाले असल्याचे सांगून भूमिहीन लाभार्थ्यांवर विशेष लक्ष देऊन त्यांना प्राधान्याने घरकुलाचा लाभ द्यावा, तसेच पुढील उद्दीष्टेही गतीने पूर्ण करावे, असे निर्देशही ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

ग्रामीण गृहनिर्माणाच्या कामांबाबत मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत मंत्री श्री. गोरे यांनी संबंधितांना निर्देशित केले. बैठकीस ग्रामविकास प्रधान सचिव एकनाथ डवले, ग्रामीण गृहनिर्माण संचालक, डॉ. राजाराम दिघे तसेच ग्रामविकास विभागातील संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गत ७२ हजार घरकुल पूर्ण**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत योजनेच्या विविध उपक्रमांमध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे. अभियानाच्या माध्यमातून: प्रधानमंत्री आवास योजना झचध-ॠ टप्पा १ आणि २०२४-२५ पूर्वीच्या राज्य योजनांतील १७,८५९ घरकुले व झचध-ॠ टप्पा २ तसेच २०२४-२५ पासूनच्या राज्य योजनांतील ५४,२३८ घरकुले अशी एकूण ७२,०९७ घरकुले आत्तापर्यंत पूर्ण झाली आ-हेत. या व्यतिरीक्त सुमारे ३० लाख घरकुलांची कामे प्रगतीपथावर असून या कालावधीत ६,०७५ भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उप-लब्ध करण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्याचे पक्के घर या उद्दिष्टाकडे ग्रामविकास विभाग सातत्याने वाटचाल करत. यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात ग्रामीण आ-वास योजनांसाठीच्या उपक्रमांमध्ये झालेल्या प्रगतीबाबत मंत्री श्री.गोरे यांनी समाधान व्यक्त करुन राज्य व क्षेत्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे त्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल कौतुक केले.

मंत्री श्री. गोरे यांनी सांगितले की, ग्रामीण महाराष्ट्र सक्षम करायच्या उद्दीष्टाने घरकुल पूर्णतेचा वेग अधिक वाढवावा. लाभार्थी केंद्रित दृष्टिकोनाने काम करावे. भूमिहीन लाभार्थ्यांवर विशेष लक्ष देण्यात यावे. तसेच लाभार्थ्यांना मनरेगा (चॠछठएॠ) अंतर्गत मजुरीचा लाभ मिळवून देण्याची कार्यवाही करण्यात यावी. झचध-ॠ टप्पा २ मधील घरकुलांना सौरऊर्जेचा लाभ देण्यावर भर द्यावा. यासोबतच नाविन्यपुर्ण (खपर्पीरींळींश) उपक्रम राबवण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांना मंत्री श्री. गोरे यांनी निर्देश दिले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्ग दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते दि ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा एक आणि राज्य पुरस्कृत योजनेतील १ एप्रिल २०२५ पुर्वीचे आणि नवीन घरकुले अभियान कालावधीत पूर्ण करणे, घरकुल मंजूर झालेल्या परंतु जागा नसलेल्या सर्व पात्र भूमिहीन लाभार्थ्यांना अभियान कालावधीत जागा उपलब्ध करून देणे, सर्व मंजूर घरकुल लाभार्थ्यांना मनरेगा अंतर्गत लाभ देणे, प्रधानमंत्री सुर्यघर योजना/ अन्य योजनेतून टप्पा-२ मधील मंजूर सर्व घरकुलांना सौर ऊर्जा प्रकल्प बसवणे, असे उपक्रमनिहाय उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

# निवडणूक आयोगाविरोधात १ नोव्हेंबरला सर्वपक्षीय मोर्चा

(पान १ वरून..) विरोधात मोर्चा निघेल. या मोर्च्याच्या नेतृत्व उद्धव ठाकरे, शरद पवार, राज ठाकरे आणि काँग्रेस चे जेष्ठ नेते करतील. १ नोव्हेंबर हा महाराष्ट्र साठी महत्वाचा आणि लोकशाही महत्वाचा असेल, असंही संजय राऊत म्हणाले. महाराष्ट्रात मोर्चा होणार आहे असाच मोर्चा हा दिल्लीत झाला होता. त्याला सर्व नेते उपस्थित होते. हा नाही तो नाही अशा बातम्या येऊ नये. प्रत्येकाचा पाठींबा या मोर्चाला आहे, असंही संजय राऊत म्हणाले.

काँग्रेस नेते सचिन सावंत केंद्रीय निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे आम्ही शिष्टमंडळ घेऊन गेलो होतो, असं म्हटलं.. राहुल गांधी यांनी आधी सांगितलं की ४१ लाख लोकसभा आणि विधानसभा निवडणूक दरम्यान वाढले आहेत. मात्र, निवडणूक आयोगाने हात झटकले आहेत. घोळ युक्त यादी आहे. चुका त्यामध्ये आ-हेत, यादी आम्हाला प्राप्त झालेली नाही. आदर्श प्रक्रिया राबवली जात नाही. या सगळ्या विरोधात आम्ही आंदोलन करणार आहोत असं सचिन सावंत म्हणाले.

भाकपचे नेते प्रकाश रेड्डी यांनी निवडणूक ही मतदार यादी वर अवलंबून असते ती पारदर्शक असली पाहिजे, असं म्हटलं. आज निवडणूक आयोगाचा खुलासा आलेला आहे तो जुजबी आहे. सुधारणा झाल्या पाहिजेत ही आमची भूमिका आहे. पुढचा कार्यक्रम आम्ही ठरवलेला आहे. भाजप ने मोडस ऑपरेंडी तयार केली आहे. मतदार यादी हा प्राथमिक मुद्दा आहे. मतदारांची तीव्र भावना दाखवण्यासाठी या मोर्चात सहभागी होऊ, असं प्रकाश रेड्डी म्हणाले.

मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी मतदार यादी मधील घोळ ही भावना लोकांच्या मनात आहे. स्वतः आमदार सुद्धा ते बोलत आहेत. निवडणूक आयोगाला आम्ही पत्र दिलं होतं. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी यांना चौकशी करण्यासाठी सांगितलं आहे. याचा अर्थ त्यांना कळलं की घोळ झाला आहे, असं बाळा नांदगावकर म्हणाले. आता ते थतूरमातुर उत्तर देत आहेत. निवडणूक आयोगाला लक्षात आलं आहे की याच्यात घोळ झाला आहे, असं बाळा नांदगावकर म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी निवडणूक आयोगाने जे उत्तर दिलं ते समाधानकारक नाही, असं म्हटलं. सत्तेत असलेले नेते जर मोर्चात सहभागी झाले तर त्यांना कोणाची ना नाही. १ तारखेला मोठा मोर्चा निघेल, असंही पाटील यांनी सांगितलं. शरद पवार यांनी मोर्चाला पाठिंबा दिला आहे. दुबार मतदार काढण्यासाठी काय कार्यक्रम हाती घेणार, पत्ते ज्यांचे नाहीत त्यांचं तुम्ही काय करणार आहात? खुलासा हा निवडणूक आयोगाने करावा, ते अनेक गोष्टी दडवून ठेवत आहेत.महाराष्ट्रात लोकशाही बद्दल आस्था आहे त्यांनी मोर्चात सहभागी व्हावं, असं जयं पाटील म्हणाले.

संजय राऊत यांनी राज्य निवडणूक आयोग हे सरकारचं गुलाम आहे, त्यामुळे त्यांच्याकडनं फार अपेक्षा नाहीत मात्र विरोधी पक्ष म्हणून आम्हाला आवाज उठवला पाहिजे, असं म्हटलं. मोर्चाचा रूट हे ते सगळे पक्ष मिळून ठरवतील. उद्धव ठाकरे, राज ठाकरे, हर्षवर्धन सपकाळ, शरद पवार या सगळ्या नेत्यांशी चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेतला आहे, असं राऊत यांनी सांगितलं.

# अकोल्याचा 'कलासक्त योद्धा' वैभव सांगळे यांची चित्रकला; जनपथ ...

(पान ३ वरून..) दिव्यांग जन पुरस्कार' जाहीर झाला होता. केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने गेल्या ३ डिसेंबर २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त विज्ञान भवन, दिल्ली येथे महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. हा राष्ट्रीय पुरस्कार त्यांनी आपल्या अनाथ, अपंग, दिव्यांग बांधवांना, सीमेवरच्या जवानांना, बळीराजांना, डॉक्टरांना, गुरुजनांना, शास्त्रज्ञांना आणि कष्टकऱ्यांना समर्पित केला होता.

जन्मतः कर्णबधिर असल्याने चौथ्या वर्षापर्यंत बोलता-ऐकता न येणाऱ्या वैभव यांचे कर्णबधिरत्व त्यांच्या आई-वडिलांच्या (स्वतः स्पीच थेरपी शिकून) अथक प्रयत्नांमुळे ७०% पर्यंत कमी झाले. वयाच्या चौथ्या वर्षापासून वडिलांनी हा-तात पेन्सिल-ब्रश देऊन चित्रकलेची आवड निर्माण केली. अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी दहावी-बारावीत प्रथम क्रमांक मिळवला आणि चित्रकलेच्या सीईटी परीक्षेत अपंगातून प्रथम येऊन मुंबईतील प्रतिष्ठित सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये प्रवेश मिळवला.

वैभव यांच्या कलाकृतींनी सा-तासमुद्रापार मजल मारली असून, इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जर्मनी, रशिया, फ्रान्स यांसारख्या देशांमध्ये त्यांची कला पोहोचली आहे. अमेरिकन दूतावास, मुंबई येथे त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करून त्यांचा सन्मान करण्यात आला आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय विभागाच्या 'दिव्य कला प्रदर्शनी'त निवड झाल्यानंतर, भारत सरकारच्या 'दिव्य कला मेळाव्यां'मध्ये दिल्ली, मुंबई, भोपाळ, गोवा, गुहाटी अशा विविध शहरांमध्ये त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते, ज्यात मुंबई येथे त्यांना 'बेस्ट डिस्प्ले अवॉर्ड' मिळाला होता.